# वैश्य सहकारी बँक लि., मुंबई

नोंदणीकृत कार्यालय : ७, तात्या घारपुरे पथ, गिरगांव, मुंबई – ४०० ००४.

स्थापना : १२–११–१९४५ नोंदणी क्र : ९४७५

## ७६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सभासदांना सूचना

वैश्य सहकारी बँक लि., मुंबई या बँकेची ७६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ठीक ११.०० वा., व्हिडिओ कॉन्फरंसिंग (V.C.) / अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्सद्वारे (OAVM) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण–२०२१/ प्र.क्र २४/१३–स–सहकार,पणन व वस्त्रोद्योग, विभाग मंत्रालय विकास इमारत, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुलै २०२१ याला अनुसरुन आयोजित केली आहे. कोविड–१९ या संसर्गजन्य विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सभेच्या ठिकाणी सभासदांनी प्रत्यक्ष हजर राहणे अपेक्षित नाही. सदर सभा व्हिसी नाऊ** (VC Now), **व्हिडीओ कॉन्फरंसिंग सेंटर, ऑफीस नं. ७, बि. विंग, पहिला मजला, श्री मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई – ४०००१३.** येथे घेण्यात येईल. सदर सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे.

### सभेपुढील विषय :

१) दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी झालेल्या ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे आणि त्यास मंजूरी देणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक ३१ मार्च २०२१ अखेरच्या आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

३) दिनांक ३१ मार्च २०21 अखेरच्या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण केलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वैधानिक लेखापरीक्षकांनी सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

४) आर्थिक वर्ष २०१९-२०२० च्या दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

५) आर्थिक वर्ष २०२०-२०२१ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे.

६) सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकाची व पुढील विकासाच्या योजनांची नोंद घेणे व त्यास मंजूरी देणे.

७) आर्थिक वर्ष २०२२-२०२३ साठी समावर्ती /अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळाला देणे.

८) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या दि.२७ एप्रिल २०२१ रोजीच्या परिपत्रक/मार्गदर्शक तत्वानुसार संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०२१-२०२२ करीता दोन वैधानिक लेखापरीक्षकांची शिफारस केली असून रिझर्व्ह बँकेकडे मंजूरीसाठी पाठविली आहे. रिझर्व बँकेकडून मंजूर वैधानिक लेखापरिक्षकाच्या नेमणुकीस मंजूरी देणे.

९) समावर्ती / वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली कर्ज खाती निर्लेखित करण्यास मंजूरी देणे.

१०) वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

११) माननीय अध्यक्षांच्या संमतीने येणारे इतर विषय.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन

ठिकाण : मुंबई

दिनांक : ०८-०९-२०२१

**(भारत अ साळवी)**

मुख्य कार्यकारी अधिकारी

# वैश्य सहकारी बँक लि., मुंबई

नोंदणीकृत कार्यालय : ७, तात्या घारपुरे पथ, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

स्थापना : १२-११-१९४५ नोंदणी क्र : ९४७५

## सभेसंबंधी विशेष सूचना :

१) सभेच्या नियोजित वेळेत गणपूर्ती न झाल्यास सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित झालेली सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी **व्हिडिओ कॉन्फरंसिंग (V.C.)** / अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (OAVM) द्वारे सकाळी ११.३० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही. जेवढे सभासद, बँकेने या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर सभेस उपस्थित राहतील त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजताना, त्यावेळी ग्राह्य धरली जाईल.

२) वार्षिक सर्वसाधारण सभेत सादर होणारा संचालकांचा अहवाल आणि ताळेबंद, नफा-तोटा पत्रकाबाबत काही सूचना किंवा जे प्रश्न विचारावयाचे असतील ते सभेपूर्वी सात दिवस म्हणजेच दि. २२ सप्टेंबर २०२१ पर्यंत बँकेच्या लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात किंवा नजीकच्या शाखांमध्ये कामकाजाच्या वेळेत लेखी स्वरूपात किंवा members.vaishyabank@gmail.com या ई-मेल वर पाठविण्यात यावेत. आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांची दखल घेण्याचे बंधन संचालक मंडळावर राहणार नाही. त्याच प्रमाणे V.C./OAVM माध्यमाद्वारे सभा होत असल्याने ती सुविधा उपलब्धही असणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

३) ७६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहण्यासाठी, सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर व ई-मेल आयडी (SMS साठी मोबाईल क्रमांक द्यावा) लॉगिन आयडी व पासवर्ड दिनांक २८/०९/२०२१ पर्यंत पाठविण्यात येईल. त्यासाठी सभासदांनी दिनांक २२/०९/२०२१ पर्यंत त्यांचे मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी (SMS साठी मोबाईल क्रमांक द्यावा),नांव व सभासद क्रमांकासह बँकेच्या members.vaishyabank@gmail.com या ई-मेल आयडी वर अथवा 93727 59082 या बँकेच्या whatsapp क्रमांकावर नोंदणी करावेत. आपली माहिती अद्ययावत करण्याचा अर्ज शाखांमध्ये व बँकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर अर्ज शाखांमध्ये किंवा वर नमूद ई-मेल द्वारे जमा करता येतील. ती माहिती उपलब्ध झाल्याशिवाय आपणांस सभेस उपस्थित राहण्याची लिंक पाठविणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होणार नाही.

४) इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक/लॅपटॉप/स्मार्टफोन याद्वारे सभासद, ह्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील. जे सभासद मोबाईलवरून कनेक्ट होणार आहेत त्यांना प्रत्येक प्रेझेंटेशनच्या वेळेस मोबाईल स्क्रीन स्लाईड करावी लागेल.

५) वार्षिक सर्वसाधारण सभा ई-कार्यक्रम खालीलप्रमाणे :

i) दिनांक २९/०९/२०२१ रोजी सभेच्या निर्धारित वेळेपूर्वी ३० मिनिटे आधी म्हणजे सकाळी १०.३० पासून सभासदांनी https://www.vcnowevents.in/Vaishya_Bank या संकेतस्थळावरून कृपया लॉगइन करावे.

ii) दिनांक २९/०९/२०२१ रोजी सभेचे कामकाज संपल्यानंतर १ तासापर्यंत वार्षिक सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आलेल्या ठरावांवर सभासदांनी त्याच लिंकवर / संकेतस्थळावर मतनोंदणी करावयाची आहे. ठराव मंजुरी बाबतचा निर्णय मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर त्याच लिंकवर / संकेतस्थळावर सायंकाळी ४.०० वाजल्यानंतर जाहीर करण्यात येईल. सदर निकाल सायं. ५.०० वाजेपर्यंत सदर लिंक/संकेतस्थळावर उपलब्ध असेल, तद्नंतर लिंक बंद होईल.

६) महाराष्ट्र शासन यांनी दि. ३०/०७/२०२१ रोजीच्या परिपत्रकात, व्हिडिओ कॉन्फरंसिंग (V.C.) / अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (OAVM) द्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी, तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ संस्थेची सेवा घेण्याची सूचना केली आहे. त्या अनुषंगाने बँकेने Unified Collaboration Services LLP यांची वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी व वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणाऱ्या ठरावांवर ऑनलाईन पद्धतीने मतनोंदणीचे आयोजन करण्यासाठी नेमणूक केली आहे. काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणामुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडित झाल्यास, तांत्रिक त्रुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरू केले जाईल. याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

७) सभासदांना लॉगइन बाबत काही तांत्रिक अडचणी असल्यास jayram.raorane@vcnow.in या ई-मेल आयडीवर अथवा ७०२१० ३२४५५ या मोबाईल क्रमांकावर सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत दुसरा व चौथा शनिवार आणि रविवार तसेच सार्वजनिक सुट्ट्यांव्यतिरिक्त संपर्क साधावा. त्यांचेकडून लॉगइन अथवा पासवर्डबाबत काही प्रश्न /अडचणी असतील,तरच त्या सोडविल्या जातील सभासदांच्या इंटरनेट कनेक्शनबाबत काही अडचणी असतील, तर त्या सोडविणे शक्य होणार नाही. तसेच सभासदांना बँकेसंदर्भात अथवा विषयपत्रिकेबाबत प्रश्न असतील तर त्याचे निराकरण या एजन्सीमार्फत दिलेल्या क्रमांकावर व मेल आयडीवर होणार नाहीत.

८) ज्या सभासदांनी तीन वर्षानंतरही लाभांश स्वीकारला नसेल, त्यांच्या लाभांशाची रक्कम राखीव निधीमध्ये जमा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९) उपविधी क्र. ३४ (ड) नुसार बँकेच्या वार्षिक अहवालाच्या प्रती सर्व सभासदांना बँकेच्या नजीकच्या शाखेतून अथवा मुख्य कार्यालयातून उपलब्ध केल्या जातील. तसेच सदर अहवाल बँकेच्या www.vaishyabank.com या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

१०) आर्थिक वर्ष २०२०-२०२१ चा वैधानिक लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण केलेला अहवाल सभासदांसाठी बँकेच्या लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत वाचण्यासाठी उपलब्ध असेल.

११) भाग प्रमाणपत्रातील नांव, पत्ता अथवा वारसदार बदल असल्यास संबंधीचे पत्र बँकेच्या शेअर्स विभाग, लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात पाठवावे, त्यानुसार योग्य नोंद करणे शक्य होईल.

१२) शेअर सर्टिफिकेट मिळाली नसल्यास ती आपले सभासदत्व असलेल्या शाखेतून कृपया घेऊन जावीत.